सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्र. ३८ वा

# मुंबई राज्य राखीव पोलीस दल अधिनियम, १९५१

(३१ मे, २००५ पर्यंत सुधारलेला)

## Bombay Act No. XXXVIII of 1951

# The Bombay State Reserve Police Force Act, 1951

*(As modified up to the 31st May, 2005)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय आणि ग्रंथागार यांनी भारतात मुद्रित केले आणि संचालक, शासकीय मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशने, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांनी प्रसिद्ध केले.

२००६

[ किंमत रु. ४.०० ]

# मुंबई राज्य राखीव पोलीस दल अधिनियम, १९५१

## अनुक्रमणिका


प्रास्ताविक

कलमें.

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रारंभ व लागू करणे . . . . . . . . . .

२. व्याख्या . . . . . . . . . . . . . .

३. राज्याच्या राखीव पोलीस दलाची रचना . . . . . . . .

४. दलाची देखरेख, नियंत्रण आणि शासनव्यवस्था . . . . . . . .

५. कमांडन्ट, सहाय्यक कमांडन्ट आणि ॲड्ज्युटन्ट यांची नेमणूक करणे . . . .

५-अ. बटालियन कमांडर्स आणि हेडक्वॉर्टर्स विंगच्या कमान्डर्सची नेमणूक . . . . . .

६. नाव दाखल करणे . . . . . . . . . . . .

७. बदली . . . . . . . . . . . . . .

८. कित्येक राखीव पोलीस अधिका-यांना द्यावयाचे नेमणुकीबद्दलचे प्रमाणपत्र व . . . .
ते केव्हा परत करावयाचे ते.

९. कमांडन्टचे सामान्य अधिकार . . . . . . . .

१०. राज्याच्या राखीव पोलीस दलांतील इसमांची सामान्य कर्तव्ये . . . . . .

११. राखीव पोलीस अधिकारी हा पोलीस ठाणे स्वाधीन असलेला अधिकारी म्हणून. . . .
समजणे.

राखीव पोलीस अधिका-यास कोणत्या परिस्थितीत बळजोरीचा उपयोग करण्याचा . .
अधिकार असेल.

१२. उपबंधाच्याविरुद्ध राजीनामा दिल्याच्या संबंधातील अपराध . . . . . .

१३. नेमणुकीबद्दलचे प्रमाणपत्र वगैरे स्वाधीन करण्याचे नाकारल्याच्या बाबतीतील अपराध. . .

१४. अधिक घोर अपराध . . . . . . . . . .

१५. कमी घोर अपराध . . . . . . . . . .

१६. हुकुमत असलेल्या राखीव पोलीस अधिका-याने आपल्या ताब्यात असलेल्या राखीव . .
पोलीस अधिका-याकडून अधिनियमाखालील अपराध घडल्याची खबर देणे.

१७. कैदेची जागा व कैद करण्यात आल्यानंतर बडतर्फ केला जाण्यास पात्र असणे. . .

१८. किरकोळ शिक्षा . . . . . . . . . . . . . .

१९. प्रत्येक राखीव पोलीस अधिकारी हा, सन १९५१ चा मुंबई अधिनियम २२ वा यात . .
व्याख्या केल्याप्रमाणेचा पोलीस अधिकारी असणे.

२०. दलातील इसमांच्या कृत्यांचे संरक्षण . . . . . . . . . .

२१. नियम करण्याचा अधिकार . . . . . . . . . .

२२. रद्द करणे व बचाव . . . . . . . . . . . .

**अनुसूची क.**

**अनुसूची ख.**

# [ सन १९५१ चा मुंबई अधिनियम ३८ वा ][1]

## [ मुंबई राज्य राखीव पोलीस दल अधिनियम, १९५१. ] †

[२३ ऑक्टोबर, १९५१.]

या अधिनियमात पुढील अधिनियमांद्वारे अनुकूलन, फेरबदल व सुधारणा करण्यात आल्या आहेत :—

सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८.

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७४.

महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०.

### मुंबई राज्यात सशस्त्र राखीव पोलीस दलाची रचना करण्याची व तिचे नियमन करण्याची तरतूद करण्याबाबत अधिनियम.

**ज्याअर्थी**, मुंबई राज्यात सशस्त्र राखीव पोलीस दलाची रचना करण्याची व तिचे नियमन करण्याची तरतूद करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी**, यावरून पुढीलप्रमाणे विधि करण्यांत येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रारंभ व लागू करणे.

१. (१) या अधिनियमास, मुंबई राज्य राखीव पोलीस दल अधिनियम, १९५१ असे म्हणावे.

[२][(२) तो, सबंध [३][ महाराष्ट्र राज्यास] लागू आहे.]

(३) तो, [४][ राज्यपुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यात] राज्य सरकार राजपत्रातील अधिसूचनेद्वारे या संबंधात नेमील अशा तारखेस [५][ अंमलांत येईल ; आणि त्या राज्याच्या ज्या भागास तो, मुंबई राज्य राखीव पोलीस दल (व्याप्ति वाढविणे आणि सुधारणा) अधिनियम, १९५८ यान्वये लागू करण्यात आला असेल त्या भागांत तो, राज्य सरकार तत्सम अधिसूचनेद्वारे जी इतर तारीख नेमील त्या तारखेस अंमलात येईल.]

(४) तो राज्याच्या राखीव पोलीस दलातील इसमास, मग ते कोणत्याही ठिकाणी असोत, लागू असेल.

व्याख्या.

२. या अधिनियमात, विषयास किंवा संदर्भास काहीही बाध येत नसेल तर,—

(क) " प्रत्यक्ष कामगिरी " या संज्ञेचा अर्थ,—

(१) ज्यामुळे शांतता भंग होईल किंवा जीवितास अगर मालमत्तेस धोका पोहोचेल अशा अपराधांस [६][ प्रतिबंध करण्याचे किंवा ] त्यांची चौकशी करण्याचें आणि अशा अपराधांशी संबंध असलेल्या अगर ज्यांना मोकळे सोडल्याने जनतेला धोका पोहोचेल अशा हलाश व धोकेबाज इसमांचा शोध करून त्यांना पकडण्याचे काम,

(२) आग विझविण्यासाठी योग्य त्या सर्व उपाययोजना करण्याचे किंवा आग, पूर, भूकंप, शत्रूचे कृत्य किंवा दंगा अशा प्रसंगी शरीरास अगर मालमत्तेस होणा-या नुकसानीस प्रतिबंध करण्याचे आणि अशा प्रसंगी शांतता व सुव्यवस्था राखण्याचे काम,

(३) कलम १० अन्वये जारी केलेल्या निदेशांत राज्य सरकार किंवा पोलीस महानिरीक्षक " प्रत्यक्ष कामगिरी " म्हणून निर्दिष्ट करील असे इतर काम, असा समजावा ;

---

[1] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी मुंबई राजपत्र, १९५१, भाग ५, पृष्ठ ३२० (इंग्रजी) पहा.

† हा अधिनियम, सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७४ च्या प्रारंभाच्या लगतपूर्वी मुंबई राज्याच्या ज्या भागास लागू नव्हता त्या भागास, लागू असेल. (पहा, सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७४, कलम २).

[२] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७४ याच्या कलम ३ (१) द्वारे मूळ पोट-कलम (२) ऐवजी हे पोट-कलम दाखल केले.

[३] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० याद्वारे " मुंबई राज्यांस " या मजकुराऐवजी दाखल केला.

[४] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७४ याच्या कलम ३ (२) (अ) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ३ (२) (ब) द्वारे " अंमलात येईल " याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(ख) " अधिपति (कमांडन्ट) " व " सहाय्यक अधिपति (असिस्टंट कमांडन्ट) " या संज्ञांचा अर्थ, कलम ५ अन्वये राज्य सरकारने अनुक्रमे त्या हुद्यावर नेमलेले इसम, असा समजावा ;

(ग) " पोलीस कमिशनर " व " डेप्युटी कमिशनर " या संज्ञांचा अर्थ, मुंबई पोलिसांबाबत अधिनियम, १९५१ यान्वये नेमलेला अनुक्रमे पोलीस कमिशनर व डेप्युटी पोलीस कमिशनर असा समजावा ;

(घ) " अनुचर " या संज्ञेचा अर्थ, राज्यातील राखीव पोलीस दलाच्या संबंधात स्वयंपाकी, मेसचा नोकर, धोबी, चांभार, न्हावी, शिंपी, झाडूवाला किंवा ऑर्डर्ली यांचे काम करण्यासाठी नेमलेला कोणताही इसम, असा समजावा ;

(ङ) " दुय्यम दर्जाचे इसम " या संज्ञेचा अर्थ, [1][ [2][कंपनी कमांडरच्या किंवा मुख्य कार्यालयाच्या दलाच्या (हेड क्वॉर्टर्स विंगच्या) कमांडरच्या] ] दर्जाहून कमी दर्जाचे राज्यातील राखीव पोलीस दलाचे इसम, असा समजावा ;

(च) " पोलीस अधिकारी " या संज्ञेचा अर्थ, पोलिसांबाबत अधिनियम, १८६१ किंवा मुंबईचा पोलिसांबाबत अधिनियम, १९५१ यात व्याख्या केल्याप्रमाणेचा प्रत्येक पोलीस अधिकारी, असा समजावा ;

(छ) " विहित केलेले " या संज्ञेचा अर्थ, ह्या अधिनिमान्वये केलेल्या नियमांवरून विहित केलेले, असा समजावा ;

(ज) " राखीव पोलीस अधिकारी " या संज्ञेचा अर्थ, ह्या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या राज्याच्या राखीव पोलीस दलाचा कोणताही इसम, असा समजावा ;

(झ) " वरिष्ठ अधिकारी " या संज्ञेचा अर्थ, कोणत्याही राखीव पोलीस अधिका-याच्या संबंधात त्याच्या दर्जाहून वरच्या दर्जाचा, किंवा त्याच्याच वर्गातील वरच्या वेतनश्रेणीचा किंवा त्याच्याच दर्जाचा परंतु त्याच्यापेक्षा जुना असलेला राखीव पोलीस अधिकारी असा समजावा ;

(ञ) यात वापरलेल्या व भारतीय दंड संहिता, दंड प्रक्रिया संहिता, १८९८* व मुंबई पोलिसांबाबत अधिनियम, १९५१ यात व्याख्या केलेल्या परंतु यात यापूर्वी व्याख्या न केलेल्या शब्दांचे व संज्ञांचे अर्थ, त्यांना त्या अधिनियमात अनुक्रमे जे अर्थ दिले असतील तेच असतील.

**राज्याच्या राखीव पोलीस दलाची रचना.**

३. (१) मुंबईचा पोलिसांबाबत अधिनियम, १९५१ यान्वये रचना केलेल्या पोलीस दलाशिवाय राज्य सरकारला, राज्यातील राखीव पोलीस दल या या नावाने ओळखले जाणारे एक सशस्त्र राखीव पोलीस दल स्थापन करण्याचा व तें कायम राखण्याचा अधिकार आहे.

(२) राज्यांतील राखीव पोलीस दलाची विहित करण्यात येईल अशा रीतीने स्थापना केली पाहिजे व ते कायम राखले पाहिजे.

(३) ह्या अधिनियमाच्या उपबंधांस अधीन राहून, राज्यांतील राखीव पोलीस दलाच्या इसमांचा पगार, निवृत्तिवेतन व नोकरीच्या इतर शर्ती राज्य सरकारकडून ठरविण्यात येतील अशा असतील ;

परंतु, ह्या कलमांतील कोणताही मजकूर भारतीय पोलीस किंवा भारतीय पोलीस सेवा यांतील ज्या इसमांचा राज्यांतील राखीव पोलीस दलांत बदली करून घेण्यात आले असेल अशा इसमांचा पगार, निवत्तिवेतन व नोकरीच्या इतर शर्ती यांस लागू असणार नाही.

---

[1] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम २ द्वारे " ॲडज्युटंट किंवा बटालियन कमांडरच्या " या शब्दां-ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम २ द्वारे " बटालियन कमांडरच्या " या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

* आता, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) पहा.

[१][(३-क) मुंबई राज्य राखीव पोलीस दल (व्याप्ति वाढविणे आणि सुधारणा) अधिनियम, १९५८ यान्वये हा अधिनियम मुंबई राज्याच्या ज्या भागास लागू करण्यांत आला आहे त्या भागात या अधिनियमाच प्रारंभ [illegible]

दलांत किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही विधिन्वये रचना केलेल्या कोणत्याही सशस्त्र राखीव दलांत असणारा आणि मुंबई राज्याच्या कामकाजाच्या संबंधात त्यांत नोकरी करणारा प्रत्येक इसम हा, (राज्य सरकारने आदेशाद्वारे अन्यथा तरतूद केली नसेल तर) अशा प्रारंभानंतर या अधिनियमान्वये रचना केलेल्या राज्य राखीव पोलीस दलातील इसम आहे असे समजण्यात आले पाहिजे आणि तद्नुसार या अधिनियामाचे उपबंध त्यास लागू होतील, आणि त्यास, राज्य राखीव पोलीस दलांतील इसमांचे किंवा तत्संबंधी दर्जाचे अधिकार, कामे आणि विशेष हक्क देण्यांत आले आहेत व तो अशा इसमाच्या किंवा दर्जाच्या जबाबदा-यांस अधीन आहे असे समजले पाहिजे; परंतु, राज्याच्या त्या भागांत या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी, त्यास जे वेतन मिळत होते, निवृत्तिवेतनाच्या संबंधातील जे हक्क त्यास होते आणि सेवेच्या ज्या इतर कोणत्याही शर्ती त्यास लागू होत्या तेच वेतन मिळण्याचे, तेच हक्क असण्याचे व त्याच शर्ती लागू असण्याचे, राज्य सरकार, पोट-कलम (३) अन्वये त्यांत बदल करीपर्यंत, रद्द करीपर्यंत किंवा सुधारणा करीपर्यंत चालू राहील, परंतु असा बदल करणे, रद्द करणे किंवा सुधारणा करणे हे, राज्यपुनर्रचना अधिनियम, १९५६ यांचे कलम ११५, पोट-कलम (७) चे परंतुक यास अधीन राहील].

(४) राज्य सरकारास किंवा त्याने यासंबंधात अधिकार दिलेल्या कोणत्याही अधिका-यास—

(क) राज्यातील राखीव पोलीस दलाची गटांत विभागणी करण्याचा,

(ख) प्रत्येक गटाची [२][* * *] कंपन्यांमध्ये व प्रत्येक कंपनीची प्लॅटूनांमध्ये पोट-विभागणी करण्याचा,

(ग) राज्य सरकारास किंवा त्याने यासंबंधांत अधिकार दिलेल्या अधिका-यास योग्य वाटेल अशा ठिकाणी कोणत्याही गटाची, [३][* * *] कंपनीची किंवा प्लॅटूनची नेमणूक करण्याचा अधिकार आहे.

दलाची देखरेख, नियंत्रण आणि शासनव्यवस्था.

**४.** राज्याच्या राखीव पोलीस दलावर देखरेख व नियंत्रण ठेवण्याचे काम राज्य सरकारकडे असेल; आणि राज्याच्या राखीव पोलीस दलाची व्यवस्था पहाण्याचे काम राज्य सरकारने या अधिनियमाच्या व त्यान्वये केलेल्या कोणत्याही नियमांच्या उपबंधांना अनुसरून, राज्य सरकार यासंबंधात वेळोवेळी नेमील अशा अधिका-यांमार्फत केले पाहिजे.

कमांडंट, [६][सहाय्यक कमांडन्ट] आणि ॲड्ज्युटन्ट यांची नेमणूक करणे.

**५.** (१) राज्य सरकारास, प्रत्येक गटासाठी, [४][पोलीस अधीक्षकाचा] हुद्दा धारण करण्यास पात्र असेल अशा इसमाची कमांडंट म्हणून व सहाय्यक किंवा प्रति-अधीक्षकाचा हुद्दा धारण करण्यास पात्र [५][असतील अशा इसमांची सहाय्यक कमांडंट व ॲड्ज्युटन्ट] म्हणून नेमणूक करण्याचा अधिकार आहे.

---

[१] सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ७४ याच्या कलम ५ व्दारे हे कलम जादा दाखल केले.

[२] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम ३(अ) द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३ (ब) द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

[४] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ३ व अनुसूची याद्वारे " जिल्हा पोलीस अधीक्षकाचा " या मजकुराऐवजी हा मजूकर दाखल करण्यात आला.

[५] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम ३(१) याद्वारे " असेल अशा इसमाची असिस्टंट कमांडंट " या शब्दाऐवजी हा मजूकर दाखल केला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ३ (४) यावरून " असिस्टंट कमांडंट " या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल केला.

(२) पोट-कलम (१) मध्ये कोणताही मजकूर असला तथापि, राज्य सरकारास त्यास योग्य वाटेल अशा सैनिकी अधिका-याची कमांडंट किंवा सहाय्यक कमांडंट [१][किंवा ॲड्ज्युटंट ] म्हणून नेमणूक करण्याचा अधिकार आहे.

(३) कमांडंटास, असिस्टंट कमांडंटास, [२][अॅड्ज्युटंटास ] व [illegible] अधिका-यास, ह्या अधिनियमावरुन किंवा अधिनियमान्वये तरतूद करण्यांत येतील असे अधिकार असतील व ते चालविण्याचा अधिकार असेल.

[४][कंपनी नायक (कमान्डर्स)] आणि हेडक्वॉर्टर्स विंगच्या कमांडर्सची नेमणूक, नांव दाखल करणे.

[३][ ५ -क. राज्य सरकारच्या सामान्य किंवा खास आदेशाचे अधीन राहून, महानिरीक्षकाने, [४][ कंपनी नायक (कमान्डर्स) ] आणि हेडक्वॉर्टर्स विंग्जचे कमांडर्स यांची नेमणूक केली पाहिजे.]

६. (१) राखीव पोलीस अधिकारी म्हणून नेमणूक केलेला कोणताही इसम कामावर रुजू होण्यापूर्वी, त्यास कमांडंट किंवा सहाय्यक कमांडंट किंवा [५][पोलीस अधीक्षकाचा ] किंवा डेप्युटी कमिशनर यांच्या दर्जाहून कमी दर्जाचा नाही अशा पोलीस अधिका-यासमक्ष, अनुसूची-अ मधील नमुन्यांतील प्रतिज्ञापत्र वाचून दाखविले पाहिजे व जर त्याची तशी इच्छा असेल तर त्याचा अर्थ समजावून सांगितला पाहिजे आणि त्याने त्यांत विहित केलेल्या शर्तीप्रमाणे वागण्याचे कबूल केल्याची खूण म्हणून त्यावर आपली सही केली पाहिजे. नंतर त्यावर यथास्थिति, अशा कमांडंटने, सहाय्यक कमांडंटने किंवा पोलीस अधिका-याने खरेपणादाखल सही केली पाहिजे.

(२) कोणत्याहि राखीव पोलीस अधिका-याने, पोट-कलम (१) अन्वये त्याने सही केलेल्या प्रतिज्ञापत्राच्या शर्तीनुसार असेल ते खेरीज करून, आपल्या हुद्दयाचा राजीनामा देता कामा नये.

(३) जर कोणताही राखीव पोलीस अधिकारी ह्या कलमांचे उल्लंघन करुन राजीनामा देईल तर तो, ह्या अधिनियमावरुन किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर विधिवरुन दिलेल्या कोणत्याही इतर शिक्षेस बाध न येता, कमांडंटच्या आदेशावरुन, त्यास त्यावेळी येणे असलेल्या पगाराची सर्व बाकी सरकारजमा केली जाण्यास पात्र असेल.

बदली.

७. (१) ह्या अधिनियमात किंवा मुंबई पोलिसांबाबत अधिनियम, १९५१ यात कोणताही मजकूर असला तथापि, राज्य सरकारला मुंबई पोलिसांबाबत अधिनियम, १९५१ यान्वये नेमलेल्या पोलीस दलाच्या [६][ * * * ] इसमांची ह्या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या राज्याच्या राखीव पोलीस दलात बदली करणे आणि ह्या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या राज्याच्या राखीव पोलिस दलातील इसमांची मुंबई पोलिसांबाबत अधिनियम, १९५१ यान्वये नेमलेल्या पोलीस [७][ दलांत ] बदली करण्याचा अधिकार असेल :

---

[१] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८ याचे कलम ३(२) यावरुन हा मजकूर जादा दाखल केला.

[२] वरील अधिनियमाचे कलम ३ (३) यावरुन हा मजकूर दाखल केला.

[३] वरील अधिनियमाचे कलम ४ द्वारे कलम ५-क हे दाखल केले.

[४] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम ४ द्वारे " बटालियन कमांडर्स " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ३ व अनुसूची याद्वारे " जिल्हा अधीक्षक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[६] वरील अधिनियमाचे कलम ५ याद्वारे " सशस्त्र विभागाच्या " हा मजकूर गाळण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या त्याच कलमावरुन " दलाच्या सशस्त्र विभागात " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

परंतु, राज्य सरकारला पोट-कलम (१) अन्वयेचे आपले अधिकार, त्या त्या पोलीस दलांतील दुय्यम दर्जाच्या इसमांची बदली करण्याशी उक्त अधिकाराचा जेथवर संबंध असेल तेथवर, महानिरीक्षकाकडे सोपविण्याचा अधिकार आहे.

(२) मुंबई पोलिसांबाबत अधिनियम, १९५१ यान्वये नेमलेल्या पोलीस दलातील इसमाची या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या राज्याच्या राखीव पोलीस दलांत बदली केल्यानंतर किंवा या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या राज्याच्या राखीव पोलीस दलांतील इसमाची, मुंबई पोलिसांबाबत अधिनियम, १९५१ यान्वये रचना करण्यात आलेल्या पोलीस दलांत बदली करण्यात आल्यानंतर तो, ज्या पोलीस दलांत त्याची बदली करण्यात आली असेल त्या पोलीस दलांतील इसम म्हणून समजला जाईल व त्यास आपली कामे करतांना, राज्य सरकार देईल अशा आदेशांस अधीन राहून, आदेशात निर्दिष्ट करण्यात येतील असे अधिकार व विशेष हक्क देण्यात आले आहेत असे समजण्यात येईल व तो, ज्या पोलीस दलांत त्याची बदली करण्यात आली असेल त्या पोलीस दलांतील, आदेशांत निर्दिष्ट करण्यांत येईल अशा दर्जाच्या इसमाच्या जबाबदारीच्या अधीन असेल.

कित्येक राखीव पोलीस अधिका-यांना द्यावयाचे नेमणूकीबद्दलचे प्रमाणपत्र व ते केव्हां परत करावयाचें ते.

८. (१) [१][ कंपनी नायक, दलनायक, मुख्य कार्यालयाच्या शाखेचे नायक किंवा प्लॅटून नायक ] यास त्याची नेमणूक झाल्यावर, पोलीस महानिरीक्षक यांजकडून त्यांचे नांव, वय, धर्म व त्याने पूर्वी कोणतीही नोकरी केली असल्यास त्या नोकरीसंबंधी तपशील असलेले नेमणुकीबद्दलचे प्रमाणपत्र मिळाले पाहिजे.

(२) [३][ प्लॅटून नायकाच्या ] हुद्दाखालील हुद्दा असलेल्या प्रत्येक राखीव पोलीस अधिका-यास, त्याची नेमणूक झाल्यावर कमान्डटच्या सही-शिक्क्याने देण्यात येईल असें अनुसूची-ब च्या नमुन्यांतील प्रमाणपत्र मिळाले पाहिजे.

(३) कोणताही इसम कोणत्याही कारणामुळे राखीव पोलीस अधिकारी म्हणून असण्याचें बंद झाल्यास, त्याने, त्यास आपल्या हुद्याची कामे पार पाडण्यासाठी देण्यांत आलेले आपले नेमणुकीचे प्रमाणपत्र व हत्यारे, साजसरंजाम, पोशाख व इतर आवश्यक गोष्टी ताबडतोब त्या घेण्यासाठीं कमान्डरनें अधिकार दिलेल्या अधिका-याच्या स्वाधीन केल्या पाहिजेत.

कमान्डन्टचे सामान्य अधिकार.

९. कमान्डन्टने, पोलीस महानिरीक्षकाच्या आदेशांस अधीन राहून, हत्यारे, कवाईत, व्यायाम, परस्पर संबंध, कामांची वाटणी या सर्व बाबींचे, व त्याच्या हाताखालील तुकडीतील इसमांनी आपली कर्तव्ये पार पाडतांना ती कोणत्या रीतीने पार पाडली पाहिजेत यासंबंधींच्या सर्व तपशीलवार सूचनांच्या बाबतीत मार्गदर्शन व नियमन केलें पाहिजे.

राज्याच्या राखीव पोलीस दलांतील इसमांची सामान्य कर्तव्ये.

१०. (१) या अधिनियमाच्या कारणासाठी प्रत्येक राखीव पोलीस अधिकारी हा [४][ मुंबई राज्यांत ] सदैव कामावर आहे असें समजण्यांत येईल, आणि कोणत्याही राखीव पोलीस अधिका-यास आणि राखीव पोलीस अधिका-यांपैकी कोणत्याही इसमास किंवा गटास, राज्य सरकार अथवा पोलीस महानिरीक्षक तसा निदेश देईल तर, राज्याच्या कोणत्याही भागांत त्यानें नोकरी करणें जोंपर्यंत व ज्या ठिकाणीं आवश्यक असेल तोपर्यंत व त्या ठिकाणीं अशा राज्याच्या कोणत्याही भागांत प्रत्यक्ष कामगिरीवर नेमण्याचा अधिकार आहे.

---

[१] सन १९५४ चा मुंबई अधिनियम ४८ याचे कलम ६ याद्वारे "ॲड्ज्युटंट बटालियन कमांडर" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम ५ (अ) याद्वारे "बटालियन कमांडर" किंवा "कंपनी कमांडर" याऐवजी हा मजकूर दाखल केला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ५ (ब) द्वारे "कंपनी कमांडरच्या" या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[४] सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ७४ याच्या कलम ६ वरून मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

(२) पोट-कलम (१) अन्वयें दिलेल्या प्रत्येक निदेशांत, कोणत्याही राखीव पोलीस अधिका-यास किंवा अशा अधिका-यांपैकी कोणत्याही इसमास किंवा गटास ज्या कामगिरीवर नेमण्यांत आल्याबद्दल निदेश देण्यांत आला असेल ती कामगिरी या अधिनियमाच्या कारणांसाठी प्रत्यक्ष कामगिरी म्हणून समजण्यांत येईल असे

**स्पष्टीकरण.**—राखीव पोलीस अधिकारी प्रत्यक्ष कामगिरीवर असणें आवश्यक आहे किंवा कसे अथवा तो प्रत्यक्ष कामगिरीवर आहे किंवा कसें याविषयींचा राज्य सरकारचा अथवा पोलीस महानिरीक्षकाचा निदेश हा अखेरचा असेल.

(३) पोट-कलम (१) अन्वयें प्रत्यक्ष कामगिरीवर नेमलेला राखीव पोलीस अधिकारी किंवा जेव्हां अनेक राखीव पोलीस अधिकारी किंवा त्यांचा गट अशा रीतीने प्रत्यक्ष कामगिरीवर नेमण्यांत आला असेल तेव्हां, असे अधिकारी किंवा त्यांचा गट स्वाधीन असलेला अधिकारी ती कामगिरी कार्यक्षम रीतीने बजाविली जाण्याबद्दल जबाबदार असेल आणि असा एक किंवा अनेक राखीव पोलीस अधिकारी किंवा राखीव पोलीस अधिका-यांचा गट कामगिरीवर नेमण्यांत आला नसता तर ती कामगिरी बजावण्यास जे जबाबदार असते त्या सर्व पोलीस अधिका-यांनी उक्त राखीव पोलीस अधिकारी किंवा त्यांच्या गट स्वाधीन असलेल्या राखीव पोलीस अधिका-यास अथवा अधिका-यांना शक्य ती सर्व मदत केली पाहिजें व त्यांच्याशी सहकार्य केले पाहिजे.

राखीव पोलीस अधिकारी हा पोलीस ठाणें स्वाधीन असलेला अधिकारी म्हणून समजणें.

**११.** (१) नाईकाच्या हुद्दापेक्षां कमी हुद्दाचा नाही अशा हजर असलेल्या सर्वात मोठ्या हुद्याचा वरिष्ठ (सिनियर) राखीव पोलीस अधिकारी हा कलम १०, पोट-कलम (१) अन्वये कोणत्याही ठिकाणी प्रत्यक्ष, कामगिरीवर नेमण्यांत आला असेल तेव्हां दंड प्रक्रिया संहिता, १८९८* च्या प्रकरण ९ च्या कारणांसाठी पोलीस ठाणे स्वाधीन असलेला अधिकारी आहे असें समजले पाहिजे.

राखीव पोलीस अधिका-यास कोणत्या परिस्थितींत बळजोरीचा उपयोग करण्याचा अधिकार असेल.

(२) भारतीय दंड संहितेची कलमें १०० व १०३ यांत कोणताही मजकूर असला तथापि, वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे कामगिरीवर नेमण्यात आलेल्या राखीव पोलीस अधिका-यास, जेव्हां त्याच्या स्वतःवर किंवा कोणत्याही राखीव पोलीस अधिका-यावर हल्ला होईल अशी वाजवी भीती वाटेल, किंवा ज्या कोणत्याही मालमत्तेचे किंवा इसमाचें रक्षण करणें हे त्याचे कर्तव्य असेल त्या मालमत्तेस किंवा इसमास नुकसान किंवा इजा पोहोंचण्याची त्यास वाजवी भीती वाटेल तेव्हां, अशी नुकसानी करणा-याविरुद्ध किंवा असा हल्ला करणा-याविरूद्ध वाजवी रीतीनें आवश्यक असेल अशा बळजोरीचा उपयोग करण्याचा अधिकार असेल ; मग अशा रीतीने बळजोरीचा उपयोग केल्यानें नुकसानी करणारा किंवा हल्ला करणारा किंवा अशा नुकसानी करणा-यास किंवा हल्ला करणा-यास मदत करणारा कोणताही इतर इसम मरण पावण्याचा धोका असला तरी हरकत नाहीं.

उपबंधांच्या विरूद्ध राजीनामा दिल्याच्या संबंधातील अपराध.

**१२.** जर कोणताही राखीव पोलीस अधिकारी कलम ६ चें उल्लंघन करून आपल्या नेमणूकीचा राजीनामा देईल तर त्यास पराकाष्ठा एक वर्ष मुदतीच्या कैदेची किंवा पराकाष्ठा एक हजार रुपये दंडाची शिक्षा होईल, किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

नेमणुकीबद्दलचें प्रमाणपत्र, वगैरे स्वाधीन करण्याचे नाकारल्याच्या बाबतींतील अपराध.

**१३.** जर कोणताही राखीव पोलीस अधिकारी कलम ८, पोट-कलम (३) यांत ठरविल्याप्रमाणे आपल्या नेमणुकीचे प्रमाणपत्र किंवा इतर कोणतीही वस्तू स्वाधीन करण्यांत जाणूनबुजून हयगय करील किंवा स्वाधीन करण्याचें नाकारतील तर त्यास, पराकाष्ठा तीन महिने मुदतीच्या कैदेची किंवा पराकाष्ठा पांचशे रुपये दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

---

* आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा ४ ) पहा.

**१४. जो राखीव पोलीस अधिकारी— अधिक घोर अपराध.

(क) कोणत्याही बंडास सुरुवात करील, चिथावणी देईल, बंड करील किंवा बंड करण्याचा कट

असल्यास, शस्त्राच्या जोरावर मोडून काढण्याची शिकस्त करणार नाही किंवा कोणतेही बंड झाले असल्याची किंवा बंड करण्याचा कोणताही इरादा किंवा कट असल्याची किंवा राज्याविरुद्ध कोणत्याही कटाची त्यास माहिती असूनही किंवा तसें वाटण्यास त्यास कारण असूनही, त्या जागीं किंवा जवळपास हजर असलेल्या आपल्या वरिष्ठ अधिका-यास त्याबद्दलची खबर, विलंब न लावतां, देणार नाही ; किंवा

(ख) आपल्या वरिष्ठ अधिका-यावर, तो तसा अधिकारी आहे हें माहीत असून किंवा तसें वाटण्यास त्यास कारण असून, मग तो कामावर असो अथवा नसो, अन्यायाची बळजोरी करील किंवा करण्याचा प्रयत्न करील किंवा त्याच्यावर हल्ला करील ; किंवा

(ग) त्याच्या स्वाधीन केलेल्या किंवा ज्याचा बचाव करणें हें त्याचें कर्तव्य असेल अशा कोणत्याही लष्करी ठाण्याचा, पहा-याचा, इमारतीचा, किल्ल्याचा किंवा मालमत्तेचा लज्जास्पद रीतीने त्याग करील किंवा ती दुस-याच्या स्वाधीन करील ; किंवा

(घ) ज्याचा प्रतिकार करणे हे त्याचे कर्तव्य असेल अशा कोणत्याही सशस्त्र उठाव केलेल्या इसमाच्या समक्ष आपली शस्त्रे व दारुगोळा लज्जास्पद रीतीने टाकून देईल किंवा अशा कोणत्याही सशस्त्र उठाव केलेल्या इसमाचा प्रतिकार करण्यापासून परावृत्त करण्यासाठी कोणत्याही राखीव पोलीस अधिका-याचे किंवा कोणत्याही पोलीस अधिका-याची मन वळविण्यासाठीं किंवा अशा सशस्त्र उठाव केलेल्या कोणत्याही इसमाविरुद्ध उपाय योजना करण्याच्या बाबतींत अशा अधिका-यास परावृत्त करण्यासाठी शब्दांचा किंवा कोणत्याही इतर साधनांचा मुद्दाम उपयोग करील किंवा जो, अशा सशस्त्र उठाव केलेल्या इसमासमोर भ्याडपणा दाखविल्याबद्दल किंवा गैरवर्तणूक केल्याबद्दल इतर रीतीने दोषी असेल ; किंवा

(ङ) राज्याविरुद्ध सशस्त्र उठाव केलेल्या कोणत्याही इसमाशी किंवा राज्याविरुद्ध किंवा सार्वजनिक सुरक्षिततेविरुद्ध कट केलेल्या कोणत्याही इसमाशी किंवा अटक करावयाच्या कोणत्याही इसमाशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे पत्रव्यवहार करील किंवा त्यास माहिती देईल किंवा त्यास साहाय्य किंवा मदत करील किंवा त्यास माहीत झालेला असा कोणताही पत्रव्यवहार किंवा माहिती हजर असलेल्या आपल्या वरिष्ठ अधिका-यास ताबडतोब कळविण्यात कसूर करील ; किंवा

(च) उपरिनिर्दिष्ट अशा कोणत्याही इसमास, कोणतीही हत्यारे, दारुगोळा किंवा सरंजाम प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे विकील, देऊन टाकील किंवा त्यांची अन्य रीतीने विल्हेवाट लावील किंवा त्यांची विक्री करण्यास, देणगी देण्यास किंवा विल्हेवाट लावण्यास कबूल होईल किंवा त्यात साहाय्य करील किंवा जाणूनबुजून अशा कोणत्याही इसमास आश्रय देईल किंवा त्याचें संरक्षण करील ; किंवा

(छ) प्रत्यक्ष कामगिरीवर असतांना,—

(१) आपल्या वरिष्ठ अधिका-याच्या वैध रीतीने दिलेल्या आज्ञेचे पालन करणार नाही, किंवा

(२) आपलें दल किंवा हुद्दा सोडून जाईल, किंवा

---

** हे कलम फेरबदल रहित असेल (पहा. मुंबई अनुकूलन आदेश १९५६)

(३) संत्री असून किंवा अन्य रीतीने सावध राहण्याविषयी सूचना देण्यांत आली असता आपल्या नेमून दिलेल्या जागेवर झोप घेईल किंवा शिरस्त्या प्रमाणे त्याची कामावरून सुटका होण्यापूर्वी किंवा परवानगी घेतल्यावाचून आपली नेमून दिलेली जागा सोडून जाईल, किंवा

(४) अधिकारावाचून कोणत्याही कारणामुळे आपल्या कमांडिंग ऑफिसरला सोडून जाईल, किंवा

(५) ज्या कोणत्याही इसमानें राज्याविरुद्ध सशस्त्र उठाव केला आहे असे वाटण्यास त्यास कारण नसेल अशा इसमावर किंवा ज्या कोणत्याही इसमास प्रतिकार करणे हे त्याचे कर्तव्य असेल अशा इसमावर अन्यायाची बळजोरी करील किंवा त्यांच्यावर हल्ला करील किंवा अधिकारावाचून लूट करण्यासाठी किंवा कोणत्याही गैरकायदेशीर कारणासाठी कोणतेही घर किंवा इतर ठिकाण फोडून आंत शिरेल किंवा जाणूनबुजून आणि अनावश्यक रीतीनें कोणत्याही प्रकारची कोणतीही मालमत्ता लुटील किंवा तिचा नाश किंवा नुकसानी करील, किंवा

(६) प्रत्यक्ष कामगिरीवर असतांना किंवा कँपमध्ये, गॅरिसनमध्ये किंवा क्वॉर्टर्समध्यें बुद्धचा खोटी हूल उठविण्यास किंवा पसरविण्यास कारणीभूत होईल,

त्या प्रत्येक राखीव पोलीस अधिका-यास, नंतर, त्यास दोषी ठरविण्यांत आलें असतां, पराकाष्ठा चौदा वर्षे मुदतीची सश्रम कैदेची शिक्षा होईल आणि दंडाचीसुद्धां शिक्षा होईल.

**स्पष्टीकरण.**—जर एखादा राखीव पोलीस अधिकारी हा, आपल्या वरिष्ठ अधिका-याच्या परवानगीवाचून, आपल्या कामाची किंवा त्यास जेथे नेमले असेल ती जागा सोडून जाईल तर तो दल सोडून गेला आहे असे समजण्यात येईल आणि जर तो, ज्या कोणत्याही पहा-यावर (संत्री), विभागात, ठिकाणी, इमारतीत, वाहनावर किंवा इतर जागेत त्यास नेमून दिलेले कोणतेही काम करण्याविषयीं त्याच्या वरिष्ठ अधिका-यानें खास आदेशान्वये त्यास फर्मावले असेल तो पहारा (संत्री), विभाग, ठिकाण, इमारत, वाहन किंवा इतर जागा सोडून जाईल तर, तो आपली नेमून दिलेली जागा (पोस्ट) सोडून गेला आहे असे समजण्यात येईल.

कमी घोर अपराध.

**१५.** जो कोणताही राखीव पोलीस अधिकारी,—

(क) कोणत्याही संत्र्याच्या अंगावर धावून जाईल किंवा त्याच्यावर अन्यायाची बळजोरी करील किंवा करण्याचा प्रयत्न करील ; किंवा

(ख) एखादा पहारा, पिकेट किंवा गस्त यावर हुकुमत असून वैध रीतीने त्याच्या स्वाधीन केलेल्या कोणत्याही कैद्यास किंवा इसमास स्वीकारण्याचें नाकारील, किंवा असा ताबा असो अगर नसो योग्य अधिकारावाचून कोणत्याही कैद्यास किंवा इसमास सोडून देईल किंवा निष्काळजीपणाने कोणत्याही कैद्यास किंवा इसमास पळून जाण्याची संधि देईल ; किंवा

(ग) एखादा पहारा, पिकेट किंवा गस्त यावर हुकूमत असून असा पहारा, पिकेट किंवा गस्त यातील कोणत्याही इसमास, जुगार खेळण्यास किंवा सुव्यवस्थेस व शिस्तीस बाध येईल अशी इतर वर्तणूक करण्यास परवानगी देईल ; किंवा

(घ) अटकेत किंवा कैदेत असून, वैध प्राधिका-याकडून त्याची मुक्तता करण्यात येण्यापूर्वी, अटकेतून किंवा कैदेतून पळून जाईल ; किंवा

(ङ) आपले काम पार पाडीत असतांना आपल्या अधिका-याशीं फार शिरजोरी करील ; किंवा

(च) क्वॉर्टर्समध्ये किंवा कार्यक्षेत्रात करण्याबद्दल आदेश दिलेल्या कोणत्याही वर्णनाच्या कोणत्याही बांधकामावर देखरेख ठेवण्याचे किंवा ते करण्याचे किंवा साहाय्य करण्याचे नाकारील ; किंवा

(छ) ज्या कोणत्याही राखीव पोलीस अधिका-याच्या संबंधांत तो वरिष्ठ अधिकारी असेल अशा राखीव पोलीस अधिका-याच्या अंगावर धावून जाईल किंवा अन्यथा त्यास वाईट रीतीने वागवील ; किंवा

(ज) आपल्या हुद्याचे काम पार पाडण्यासाठी त्यास पुरविलेली त्याचीं शस्त्रे, पोशाख, हत्यारे, सामग्री, दारुगोळा, सरंजाम किंवा इतर जरुरीच्या वस्तू किंवा त्याच्या किंवा इतर कोणत्याही इसमाच्या हवाली केलेल्या अशा कोणत्याही वस्तू यांचे बुद्धया किंवा निष्काळजीपणे नुकसान करील किंवा त्या हरवील, किंवा लबाडीने किंवा योग्य अधिकारांवाचून त्यांची विल्हेवाट लावील ; किंवा

(झ) आपल्या स्वतःमध्ये आजार किंवा नबळेपणा असल्याचा बहाणा करील किंवा ढोंग करील किंवा आजार किंवा नबळेपणा उत्पन्न करील अथवा आजारातून बरे होण्यास विलंब लागेल असें बुद्धया करील अथवा आपला आजार किंवा नबळेपणा बुद्धया वाढवील ; अगर

(ञ) स्वतःस अगर इतर कोणत्याही इसमास कामगिरी बजावण्यास अयोग्य करण्याच्या इराद्यानें स्वतःला किंवा इतर कोणत्याही इसमाला आपखुशीने दुखापत करील ; किंवा

(ट) जुलूमाने घेण्याचा अपराध करील किंवा वैध प्राधिकारावांचून कोणत्याही इसमांपासून जुलूमानें वाहन, ओझे अथवा सामान मिळवील ; किंवा

(ठ) सरकारी कामासाठी वापरण्यांत येत असलेल्या कोणत्याही जनावरास बुद्धया किंवा निष्काळजीपणे वाईट रीतीनें वागवील किंवा त्यास दुखापत करील किंवा त्याचा मृत्यू घडवून आणील किंवा अशा वाहनाचें किंवा जनावराचे नुकसान करील किंवा ते हरवील किंवा पळवून नेईल ;

त्यास, दोषी ठरविण्यांत आलें असता पराकाष्ठा सहा महिने मुदतीची सश्रम कैदेची शिक्षा होईल किंवा पराकाष्ठा पांचशे रुपये दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

**हुकुमत असलेल्या राखीव पोलीस अधिका-यानें आपल्या ताब्यात असलेल्या राखीव पोलीस अधिका-याकडून अधिनियमाखालील अपराध घडल्याची खबर देणे.**

१६. ज्या राखीव पोलीस अधिका-याच्या हुकुमतीत कोणताही पहारा, पिकेट, पार्टी गस्त किंवा तुकडी असून त्याच्या ताब्यात असलेल्या कोणत्याही राखीव पोलीस अधिका-यानें ह्या अधिनियमांचें कलम १४ किंवा १५ अन्वये शिक्षा होण्याजोगा कोणताही अपराध केल्याचे किंवा करण्याचा कट केल्याचे माहीत असून आपल्या वरिष्ठ अधिका-यास असा अपराध किंवा कट केल्याबद्दलची माहिती देण्याचें बुद्धया टाळील किंवा वाजवी सबबीवाचून,आणि ती सबब सिद्ध करण्याची जबाबदारी त्याच्यावर असेल, ती देण्यास चुकेल त्यास, दोषी ठरविण्यांत आले असता, पराकाष्ठा सहा महिने मुदतीची सश्रम कैदेची शिक्षा होईल किंवा पराकाष्ठा पांचशे रुपये दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

देची जागा व कैद करण्यात आल्यानंतर ... गण्यास पात्र असणें.

१७. (१) ह्या अधिनियमांन्वये कैदेची शिक्षा देण्यात आलेला प्रत्येक इसम राज्यांतील राखीव पोलीस दलांतून बडतर्फ करण्यांत येईल, आणि त्याचा पगार, भत्ते व त्याशिवाय, त्याला येणे असलेल्या इतर रकमा तसेंच त्याला मिळालेली पदके व फिती ही जप्त केली जाण्यास पात्र असतील.

(२) अशा प्रत्येक इसमास, त्यास अशा रीतीने बडतर्फ करण्यांत आले असेल तेव्हा, ठरविलेल्या तुरुंगांत कैदेत ठेवण्यात आले पाहिजे, परंतु त्याला राज्यांतील राखीव पोलीस दलांतून अशा रीतीनें बडतर्फ करण्यांत आलें नसेल तेव्हां, त्यास, न्यायालय तसा निदेश देईल तर, क्वार्टर-गार्डमध्ये किंवा न्यायालयास योग्य वाटेल अशा इतर जागेत अटकेत ठेवण्याचा अधिकार आहे.

रकोळ शिक्षा.

१८. (१) कमांडंट, किंवा कमांडंटच्या नियंत्रणास अधीन राहून सहाय्यक कमांडंट, किंवा त्याच्या नियंत्रणास अधीन राहून, कमांडंटच्या किंवा सहाय्यक कमांडंटच्या गैरहजेरीत एखाद्या तुकडीचा किंवा आऊटपोस्टचा स्वतंत्रपणे ताबा असलेल्या किंवा ग्रुप हेड क्वॉर्टर्सचा तात्पुरता ताबा असलेल्या जमादाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी, यास, [१][हवालदार मेजरपेक्षा] वरचा दर्जा नसलेल्या कोणत्याही राखीव पोलीस अधिका-यास किंवा त्याच्या अधिकाराखाली असलेल्या कोणत्याही अनुचरास, शिस्तीविरुद्ध असलेल्या ज्या कोणत्याही अपराधाची ह्या अधिनियमांत अन्य रीतीनें तरतूद करण्यांत आली नसेल किंवा जो अपराध यथास्थिति कमांडंटच्या, सहाय्यक कमांडंट किंवा अधिकारी यांच्या मतें फौजदारी न्यायालयापुढें खटला चालविण्याजोग्या पुरेशा गंभीर स्वरुपाचा नसेल असा अपराध केल्याबद्दल पुढीलपैकीं कोणत्याही शिक्षा देण्याचा अधिकार आहे :—

(क) जेव्हा कमांडंटने आदेश दिला असेल तेव्हा, पराकाष्ठा चौदा दिवस आणि जेव्हा इतर कोणत्याही अधिका-याने आदेश दिला असेल तेव्हा, पराकाष्ठा सात दिवस मुदतीची शिक्षेची कवाईत, जादा पहारा, थकविणें (फटिग) किंवा इतर कोणतेंही काम ;

(ख) जेव्हा कमांडंटने आदेश दिला असेल तेव्हा पराकाष्ठा एक महिन्याचा आणि जेव्हां इतर कोणत्याही अधिका-यानें आदेश दिला असेल तेव्हां, दहा दिवसाचा पगार भत्ते किंवा त्यास आवश्यक वाटेल असा पगाराचा व भत्त्यांचा भाग जप्त करणें ;

(ग) एक महिन्याच्या पगारापेक्षा अधिक नसणा-या रकमेइतका दंड :

परंतु,—

(१) कमांडंट किंवा सहाय्यक कमांडंट किंवा जमादाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला इतर अधिकारी यानें ह्या पोट-कलमान्वयेंचा कोणताही अधिकार, ह्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा, ज्यास द्यावयाची तो इसम शिस्तभंग केल्याचे किंवा गैरवर्तणूक झाल्याचे वेळीं व सदरहू अधिकार चालविण्यात आल्याचे वेळीसुद्धा अशा अधिका-याच्या ताब्यात असेल तो प्रसंग खेरीज करून, चालवितां कामा नयें; आणि

(२) जेव्हा परंतुक (१) अन्वये एकापेक्षा अधिक अधिकारी उक्त अधिकार चालविण्यास पात्र असतील तेव्हां, अशा अधिका-यांपैकी सगळयांत वरिष्ठ अधिका-याने उक्त अधिकार चालविला पाहिजे.

(२) पोट-कलम (१) मध्यें निर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी कोणत्याही शिक्षा स्वतंत्रपणे किंवा दुस-या एका किंवा अनेक शिक्षांसह देतां येतील :

परंतु, पगार किंवा भत्ते जप्त करतांना त्याच वेळी दंडाची शिक्षा करतां कामा नये.

---

[१]सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम ६ द्वारे "बटालियन हवालदार मेजरपेक्षा" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(३) पोट-कलम (४) मध्ये तरतूद केल्याप्रमाणेच्या दंडाच्या शिक्षेच्या आदेशावरून असेल ते खेरीज करून, ह्या कलमान्वये केलेल्या शिक्षेच्या कोणत्याही आदेशाविरुद्ध कोणतेंही अपील करता येणार नाही.

(४) दंडाची शिक्षा देणा-या कोणत्याही आदेशाविरुद्ध राज्य सरकारकडे किंवा राज्य सरकार याबाबत सामान्य किंवा खास आदेशाद्वारे निर्दिष्ट करील अशा अधिका-याकडे अपील करता येइल.

(५) जेव्हा एखादा कमांडंट किंवा सहाय्यक कमांडंट किंवा इतर अधिकारी पोट-कलम (१) अन्वयें आदेश देईल तेव्हां त्यानें त्या कारणाकरिता ठेवावयाच्या पुस्तकात, अपराधाचे संक्षिप्त वर्णन व साक्षीदारांची नांवे, कसूर करणारानें सादर केलेले स्पष्टीकरण, आणि शिक्षेचा आदेश हीं दाखल केली पाहिजेत आणि अशा प्रत्येक आदेशावर सही करून तारीख लिहिली पाहिजे.

प्रत्येक राखीव पोलीस अधिकारी हा, सन १९५१ चा मुंबई अधिनियम २२ वा यात व्याख्या केल्याप्रमाणेंचा पोलिस अधिकारी असणें.

**१९.** ह्या अधिनियमाच्या उपरिनिर्दिष्ट कलमात खास तरतूद करण्यांत आली असेल तो प्रसंग खेरीज करून, प्रत्येक राखीव पोलीस अधिकारी हा, सर्व कारणाकरितां, मुंबईचा पोलिसाबाबत अधिनियम, १९५१ यांत व्याख्या केल्याप्रमाणेचा पोलीस अधिकारी आहे असे समजण्यात आले पाहिजे आणि त्या अधिनियमाचे उपबंध जेथवर ते ह्या अधिनियमाच्या उपबंधाशीं विसंगत नसतील तेथवर अशा प्रत्येक राखीव पोलीस अधिका-यास लागू असतील.

दलांतील इसमांच्या कृत्यांचे संरक्षण.

**२०.** (१) सक्षम प्राधिका-याचे अधिपत्रास (वॉरंटास) किंवा आदेशास अनुसरून केलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल राज्याच्या राखीव पोलीस दलांतील कोणत्याही इसमाविरुद्ध चालविण्यांत येणा-या कोणत्याही दाव्यांत किंवा खटल्यात त्याने, अधिपत्राच्या किंवा आदेशाच्या अधिकारान्वये असे कृत्य केलें होते असा बचाव करणें वैध असेल.

(२) असा कोणताही बचाव सदरहू कृत्य करण्याविषयी निदेश देणारे अधिपत्र किंवा आदेश हजर करून सिद्ध करता येईल आणि ते अशा रीतीने सिद्ध करण्यात आल्यास उक्त दलांतील इसम, तदनंतर ज्या अधिका-याने असे अधिपत्र किंवा आदेश काढला होता त्या अधिका-याच्या हुकुमतींत कोणताही दोष असला तरीही, त्यानें अशा रीतीने केलेल्या कृत्याच्या संबंधातील जबाबदारीतून मुक्त होईल.

(३) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही विधीमध्ये कोणताही मजकूर असला तरीही, ह्या अधिनियमाच्या किंवा त्यान्वये केलेल्या नियमांच्या कोणत्याही उपबंधावरून किंवा त्यास अनुसरून मिळालेल्या अधिकारान्वये केलेल्या किंवा करण्याचा इरादा असलेल्या कृत्याबद्दल राज्याच्या राखीव पोलीस दलांतील कोणत्याही इसमाविरुद्ध वैध रीतीने दाखल करता येईल असे कोणतेंहि वैध कामकाज, मग ते दिवाणी असो अथवा फौजदारी असो, तक्रार करण्यांत आलेले कृत्य घडल्यानंतर परंतु अन्य रीतीने नव्हे, सहा महिन्यांच्या आंत सुरू करण्यांत आले पाहिजे, व अशा कामकाजाची व त्याच्या कारणाची लेखी नोटीस असे कामकाज सुरुं होण्यापूर्वी निदान एक महिना अगोदर प्रतिवादी किंवा त्याचा वरिष्ठ अधिकारी यास दिली पाहिजे :

परंतु, राज्य सरकारची मंजुरी घेऊन तक्रार करण्यांत आलेले कृत्य घडल्यानंतर कोणत्याही वेळीं असे कामकाज सुरु करता येईल.

नियम करण्याचा अधिकार.

२१. (१) राज्य सरकारास, ह्या अधिनियमाचे हेतू पार पाडण्यासाठीं ह्या अधिनियमाशी विसंगत नसतील असे नियम करण्याचा अधिकार आहे.

(२) विशेषकरून व यापूर्वीच्या उपबंधांच्या सामान्यतेस बाध येऊ न देता अशा नियमात पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींची तरतूद करण्याचा अधिकार आहे :—

(क) राज्यातील राखीव पोलीस दलाची संख्या, वर्ग व वेतनश्रेणी यांचे नियमन करणें ;

(ख) राज्यातील राखीव पोलीस दलाची शासनव्यवस्था ;

(ग) कनिष्ठ दर्जाच्या शिपायांमधील इसमांची भरती, संघटना, वर्गवारी व शिस्त ;

(घ) दलाची तपासणी ;

(ङ) दलांतील इसमांस पुरवावयाची शस्त्रे, साजसरंजाम, पोशाख व इतर जरूरीच्या वस्तू यांचे वर्णन व परिमाण.

रद्द करणे व बचाव.

[१][ २२. मुंबई राज्य राखीव पोलीस दल (व्याप्ति वाढविणें सुधारणा) अधिनियम, १९५८ यान्वये हा अधिनियम मुंबई राज्याच्या ज्या भागास लागू करण्यांत आला आहे त्या भागात त्या अधिनियमाचा प्रारंभ झाल्यावर सौराष्ट्र राखीव पोलीस दल अधिनियम, १९५५, आणि या अधिनियमासारखा किंवा सशस्त्र राखीव पोलीस दलाची रचना आणि नियमन करण्याच्या संबंधांतील आणि राज्याच्या त्या भागात अंमलात असणारा इतर कोणताही विधि रद्द होईल :

परंतु, असा कोणताही अधिनियम रद्द करण्यात आल्यामुळे —

(क) अशा रीतीने रद्द केलेल्या कोणत्याही विधीचा पूर्वीचा अंमल, किंवा

(ख) अशा रीतीने रद्द केलेल्या विधीच्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधांविरूद्ध केलेल्या कोणत्याही अपराधाच्या संबंधांत झालेली शास्ति, जप्ति किंवा शिक्षा,

(ग) उपरोक्त शास्ति, जप्ति किंवा शिक्षा यासंबंधांतील कोणतीही चौकशी, वैध कारवाई किंवा उपाययोजना,

यास बाध येणार नाही आणि जणू हा अधिनियम राज्याच्या संबंधित भागात अंमलात आला नाही असे समजून अशी कोणतीही चौकशी, वैध कारवाई किंवा उपाययोजना करता येईल, चालू ठेवता येईल किंवा अंमलात आणता येईल, आणि अशी कोणतीही शास्ति, जप्ति किंवा शिक्षा करता येईल :

तसेच, पूर्ववर्ति परंतुकास अधीन राहून, अशा रीतीने रद्द केलेल्या विधीच्या उपबंधान्वयें किंवा तदनुसार (केलेल्या कोणत्याही नेमणुका, दिलेली प्रमाणपत्रे, केलेले नियम किंवा आदेश, किंवा दिलेले निदेश धरून) केलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली उपाययोजना ही,या अधिनियमाच्या उपबंधांशीं विसंगत नसेल तेथवर, या अधिनियमाच्या तत्सम उपबंधान्वये करण्यांत आली आहे असे समजले पाहिजे. ]

---

[१] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७४ याच्या कलम ७ अन्वये कलम २२ दाखल करण्यात आले.

## अनुसूची क

(कलम ६ पहा.)

राज्याच्या राखीव पोलीस दलांतील नेमणुकीवर रूजू होण्यापूर्वी सही करून द्यावयाचा प्रतिज्ञापत्राचा नमुना.

मी, (संपूर्ण नाव) ............................................................................................

............................................................................................................

(पोलीस दलांतील इसम असल्यास, त्याचा हुद्दा/नवीन भरती करून घेतलेला इसम असल्यास, त्याचा पत्ता)

............................................................................................................

............................................................................................................

असे प्रतिज्ञापत्र लिहून देतो की,—

(१) राज्याच्या राखीव पोलीस दलांत ज्या कोणत्याही ठिकाणी माझी नेमणूक करण्यात येईल त्या ठिकाणी मी नोकरी करण्यास तयार आहे.

(२) राज्याच्या राखीव पोलीस दलांतील नोकरीची विहित केलेली मुदत मी पूर्ण करीपर्यंत राज्याच्या राखीव पोलीस दलांतील माझ्या हुद्दाचा राजीनामा देण्याचा किंवा दुस-या कोणत्याही पोलीस दलांत बदली करून मिळण्यासाठीं अर्ज करण्याचा हक्क मला असणार नाही, आणि

(३) नोकरची विहित केलेली मुदत संपविल्यानंतरही, प्रस्तुत तारखेस मी प्रत्यक्ष कामगिरीवर असल्यास, अथवा यथास्थिती माझ्या राजीनाम्यामुळे किंवा बदलीमुळे, माझ्या गटांतील रिकाम्या जागांचे प्रमाण, गटासाठी मंजूर केलेल्या संख्येच्या बाबतीत, राज्य सरकारकडून त्या त्या वेळी विहित करण्यांत आलेल्या शेकडा प्रमाणापेक्षा अधिक होणार असेल तर, पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या रीतीने मला माझ्या हुद्दाच्या जागेचा राजीनामा देण्याचा अथवा बदलीसाठी अर्ज करण्याचा हक्क असणार नाही.

वरील प्रतिज्ञापत्र, प्रतिज्ञापत्र लिहून देणारास वाचून दाखविण्यात व समजावून सांगण्यात आले व ते त्यास समजल्याचे व मान्य केल्याचे निदर्शक म्हणून सही. ............................................

............................................

तारीख ................................

जागा ................................

(संपूर्ण नाव)............................................................................................

............................................................................................................

(पोलीस दलांतील इसम असल्यास, त्याची हुद्दा/नवीन भरती करून घेतलेला इसम असल्यास, त्याचा पत्ता)............................................................................................

............................................................................................ यांस,

वरील प्रतिज्ञापत्र समजले व ते त्याने मान्य केले आणि माझ्या समक्ष त्याने त्यावर सही केल्याबद्दल मी स्वतःची खात्री करून घेतल्यानंतर माझ्या समक्ष सही करण्यात आली.

सही ................................

ज्या अधिका-यासमोर प्रतिज्ञापत्रावर सही करण्यात आली अशा अधिक-याचा हुद्दा. } कामांडट अथवा सहाय्यक कमांडट अथवा पोलीस अधिकारी.

तारीख ................................

ठिकाण ................................

## अनुसूची ख

(कलम ८ पहा.)

[१] [प्लॅटून नायक] या हुद्याखालील राज्याच्या राखीव पोलीस अधिका-यास द्यावयाचा प्रमाणपत्राचा नमुना.

| कमांडटचा शिक्का. |
|---|

अ, ब याची [२][महाराष्ट्र राज्यातील] राज्याच्या राखीव पोलीस दलांत नेमणूक करण्यात आली आहे, आणि त्यास, मुबई राज्याचा राखीव पालीस दलाबाबत अधिनियम, १९५१ (सन १९५१ चा मुंबई अधिनियम वा) याखालील राखीव पोलीस अधिका-याचे अधिकार, कर्तव्ये व विशेष हक्क देण्यात आले आहे.

(सही) ..................................

कमांडंट,

राज्याचे राखीव पोलीस, गट..........

..........................................

(True translation)
Y. H. PITKE,
Examiner of Books and Publications, Bombay.

---

[१]सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम ७ द्वारे "कंपनी कमांडर" या मजूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२]महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्त्ती विषय) आदेश, १९५० याद्वारे "मुंबई राज्यातील" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

शासकीय मुद्रणालय, नागपूर